प्रेसनोट दिनांक ०६/०६/२०२५

लोकसेवक संजीपान प्रभाकर सानप वय–४४वर्षे, शिरस्तेदार, जिल्हा अधिक्षक कार्यालय, भुमी अभिलेख, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) प्रकल्प, सिडको, नवी मुंबई यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नवी मुंबई यांनी घेतले ताब्यात.

| | | |
|---|---|---|
| ला. प्र.विभाग/घटक | :– | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| ठाणे दैनंदिनी नोंद कमांक | :– | सीबीडी बेलापुर पो.स्टे., नवी मुंबई ठाणे दैनंदिनी नोंद कमांक–२८/२०२५–वेळ १८:०५ वा. दि. ०६/०६/२०२५. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :– | संजीपान प्रभाकर सानप वय–४४वर्षे, शिरस्तेदार,(वर्ग–३) जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) प्रकल्प सिडको, नवी मुंबई. |
| लाचेची मागणी रक्कम | :– | रू. २,००,०००/–, पहिला हप्ता रु.५०,०००/– |
| स्विकारलेली रक्कम | :– | रू. ५०,०००/– |
| थोडक्यात हकिकत | :– | यातील तक्रारदार यांच्या मित्राची मिळकत ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) प्रकल्पाअंतर्गत येत असल्याने त्यांचे मित्राने सदर जमिनीचा पोट हिस्सा सर्व्हे करण्यासाठी जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना) प्रकल्प सिडको, नवी मुंबई यांना अर्ज दिला होता. त्यांचे मित्राने वरील जमिनीचा सर्वे व आकारफोड करण्याचे पुढील कामकाज करण्यासाठी तक्रारदार यांना अधिकारपत्र दिलेले आहे. त्यानुसार तक्रारदार यांनी सदर कामासाठीची शासकीय चलनाची रक्कमही बँकेत जमा केली. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक यांची भेट घेवून त्यांना जमीनीच्या सर्व्हे मोजणीची तारीख मिळणेबाबत विचारले असता, लोकसेवक यांनी सदर जमिनीची आकारफोड व सर्व्हेचे काम करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे एकूण रुपये २,००,०००/– ची मागणी केली व त्याचा पहिला हप्ता रूपये ५०,०००/–मागितले बाबत दि.०४/०६/२०२५ रोजी तक्रार प्राप्त झाली होती.<br>तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारीनुसार दि. ०५/०६/२०२५ रोजी पंचांसमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी वेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे एकूण रुपये २,००,०००/– लाचेची मागणी करुन त्याचा पहिला हप्ता रूपये ५०,०००/–मागितले असल्याचे निष्पन्न झाले होते.<br>त्यानुसार दि. ०६/०६/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडुन ५०,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारताना पंच साक्षीदार यांचेसमक्ष रंगेहाथ पकडुन ताब्यात घेण्यात आलेले आहे. तरी लोकसेवक यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही चालु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

**मार्गदर्शन अधिकारी :-मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम, ४००६०१ |
| संकेतस्थळ | :- acbmaharashtra@mahapolice.gov.in |
| ई-मेल | :- spacbthane@mahapolice.gov.in |
| ऑन लाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- acbmaharashtra.net |
| टोलफ्री नं. | :- १०६४ |
| दुरध्वनी क्र. | :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४ |
| व्हॉटस्ॲप क्र. | :- ७०६६६३५६६६ |

Police Inspector, Anti Corruption Bureau, Navi Mumbai

(अरुंधती येळवे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

Scanned with OKEN Scanner